प्र. अभि. (वि.नि.)

महोदय,
उचित कार्यवाहीसाठी
कृपया अग्रेषित.

RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ७२(२)] गुरुवार, सप्टेंबर ५, २०१३/भाद्र १४, शके १९३५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १२४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ सप्टेंबर २०१३.

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०१३/अनौ.सं.क्र. १९/प्र.क्र. २३५(२)/म-१.— ज्याअर्थी उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. पीएसआय-२०१३/(सीआर-५४)/उद्योग-८, दिनांक २७ जून २०१३, अन्वये शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.पीएसआय-२०१३/(सीआर-५४)/उद्योग-८, दिनांक १ एप्रिल २०१३ नुसार जाहीर करण्यात आलेल्या सामुहिक प्रोत्साहन योजनेमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्याअर्थी, आता महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, (१९५८ चा अधिनियम क्र. ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, लोकहितास्तव पुढील कार्यवाही करणे आवश्यक असल्याची खात्री पटत असल्याने खालील अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रकल्पांच्या/उद्योगांच्या/युनिटांच्या पहिल्या संलेखांवर आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क दिनांक १ एप्रिल २०१३ रोजी सुरू होणाऱ्या व दिनांक ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी (दोन्ही दिवस धरुन) खालील शर्तीवर माफ करण्यात येत आहे :—

**शर्ती.**— (१) ज्या प्रकल्प/उद्योग/युनिटांना मुद्रांक शुल्कातून माफी देण्यात आली आहे त्यांचेकडून सामुहिक प्रोत्साहन योजना, २०१३ मधील कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास त्यांना जणू काही सुरूवातीपासूनच माफी देण्यात आली नसल्याप्रमाणे मुद्रांक शुल्क व दंड भरण्यास पात्र ठरेल.

(२) ज्या कोणत्या प्रकल्प/उद्योग/युनिटांना उक्त योजनेअंतर्गत मुद्रांक शुल्क माफी/सवलतीचा लाभ घेतला असल्यास, ती युनिटे अन्य कोणतेही आदेश किंवा नियम किंवा अन्य कोणत्याही योजनेअंतर्गत लाभ घेण्यास पात्र ठरणार नाहीत.

**स्पष्टीकरण.**— (१) या आदेशाच्या प्रयोजनासाठी प्रकल्प/उद्योग/युनिट याचा अर्थ सामुहिक प्रोत्साहन योजना, २०१३ अंतर्गत विनिर्दिष्ट केलेल्या अंमलबजावणी अभिकरणाने किंवा या बाबतीत त्यांनी प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्यांनी प्रमाणित केले असेल असे प्रकल्प/उद्योग/युनिट असा आहे.

(२) या आदेशाच्या प्रयोजनासाठी पात्र प्रकल्प/उद्योग/युनिट त्यांच्या गुंतवणूक कालावधीमध्ये मुद्रांक शुल्कातून सवलतीस पात्र असतील.

**अनुसूची**

| अ.क्र (१) | प्रकल्प/उद्योग/युनिट प्रकार आणि क्षेत्र (२) | अनुज्ञेय सवलत (३) | संलेखाचे प्रकार व अधिनियमातील अनुसूची-१ मधील अनुच्छेद (४) |
|---|---|---|---|
| १ | "अ" व "ब" वर्गीकृत क्षेत्रे वगळून, सूक्ष्म लघु, मध्यम, मोठे, विशाल, अतिविशाल सर्व पात्र प्रकल्प/उद्योग/युनिटे. | १००% | जमिनीचे संपादन (अनुच्छेद २५), भाडेपट्टा (अनुच्छेद ३६), भाडेपट्टयाचे हस्तांतरण (अनुच्छेद ६०), विक्री प्रमाणपत्र (अनुच्छेद १६), मुदत कर्ज (अनुच्छेद ६ आणि ४०). |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २ | "अ" व "ब" वर्गीकृत क्षेत्रामधील माहिती तंत्रज्ञान आणि जैविक तंत्रज्ञान पार्कातील फक्त माहिती तंत्रज्ञान, जैविक तंत्रज्ञान युनिटे. | १००% | जमिनीचे संपादन (अनुच्छेद २५), भाडेपट्टा (अनुच्छेद ३६), भाडेपट्ट्याचे हस्तांतरण (अनुच्छेद ६०), विक्री प्रमाणपत्र (अनुच्छेद १६), मुदत कर्ज (अनुच्छेद ६ आणि ४०). |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

राजेश नार्वेकर,
शासनाचे उप सचिव.

बृहन्मुंबई महानगर पालिका
प्रमुख अभियंता (विकास नियोजन)
यांचे कार्यालय
११ १२ १ २ ३ ४ ५ ६
18 OCT 2013
022010
क्र.प्र.अ./वि.नि.
साधारण | शहर | पूर्व. उप | प. उप
मा. अधि. | टिडीआर | लेखा | आस्था
19/x

Dy.ChE(DP)I/II

CHE/ 22010 /DP/GEN OF 07-11-13

COPY TO

D.M.C. (Vig.) / Dir. (ES&P) / DMC to M.C.

CH.E.D.P.

DY.CH.E.D.P.(I)/II

DY.CH.E.B.P.(CITY)/ES/WS – I/II

E.E.(P)TO DIR (ES&P)/E.E.(P) TO CH.E.D.P. / O.S.D. to M.C.

E.E.D.P. (CITY)/E.E.D.P.(WS) (P&R) (H&K) /E.E.D.P.(ES)

E.E.B.P.(CITY)(I)(II)(III)/E.E.B.P. (E.S.) I / II

E.E.B.P. (W.S.) (H&K/E)(K/W&P)(R)/E.E.T.P.(VARIATION)

A.E.D.P. (City) (I)(II)(III)

A.E.D.P.(L&N) (S&T)/A.E.D.P.(M)/A.E.D.P.(H/E&K/E)(H/W&K/W)

A.E.D.P. (P/S) (P/N)A.E.D.P. (R/N)(R/S)(R/CENTRAL)

S.E.D.P.

Copy ~~forwarded~~ Submitted for information and necessary action please.

7/11/10

**ADMINISTRATIVE OFFICER**
**(DEVELOPMENT PLAN)**

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 4th September 2013

### Order

THE MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank-2013/UOR No. 19/CR-235(2)/M-1.– Whereas, Government of Maharashtra, Industries, Energy and Labour Department *vide* Government Corrigendum, No. PSI-2013/(CR-54)/ IND-8, dated 27th June 2013 amended the " Package Scheme of Incentives-2013 " declared *vide* Government Resolution, Industries, Energy and Labour Department, No. PSI-2013/(CR-54)/IND-8, dated 1st April 2013. Now therefore, in exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958), (hereinafter referred to as the ' the said act ') the Government of Maharashtra being satisfied that it is necessary so to do in the public interest hereby remits the stamp duty, chargeable on the first instrument of the project/industry/units mentioned in column 4 of the schedule appended here to, of Schedule-I appended to the said Act, for the period starting from the 1st April 2013 and ending on 31st March 2018, (Inclusive of both days) subject to following condition namely :—

*Condition.*—(*i*) Any project/industry/units for which the remission in the stamp duty is granted commits breach of any of the conditions of the " Package Scheme of Incentives-2013 " shall be liable to pay the whole the stamp duty and penalty, if any, as if there was no reduction in stamp duty from the beginning.

(*ii*) The project/industry/units which availed the remission under this order shall not be, entitled for remission of the stamp duty as per reduction or remission granted by any other order or rule or by any other policy.

*Explanation.*—(*1*) For this purpose project/industry/unit means which is certified by the Implementing Agency specified under " Package Scheme of Incentives-2013 " or any other officer authorised in this behalf.

(*2*) Eligible project/industry/units will be eligible for stamp duty exemption during their investment period.

*Schedule*

| Serial No. (1) | Type of project/industry/ units and Zone (2) | Extent of Remission (3) | The type of Instruments under Articles of the Schedule I of the Act. (4) |
|---|---|---|---|
| 1 | Other than A and B areas, all eligible Micro, Small, Medium, Large, Mega and Ultra Mega Units. | 100% | Acquiring land (article 25), Lease (article 36), Transfer of Lease by assignment (article 60), Sale certificate (article 16), term loan (article 6 and 40). |
| 2 | In A and B areas, only to IT and BT units in IT and BT Parks. | 100% | Acquiring land (article 25), Lease (article 36), Transfer of Lease by assignment (article 60), Sale certificate (article 16), term loan (article 6 and 40). |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJESH NARVEKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21 A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.